**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१६ मधील नि.५४ वरील आदेश</u>.**

(**CNR-MHAH** २३-०००१७१-२०१६)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्रं. १ यांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये नि.४१ वरील आदेशाप्रमाणे वादीने दावा दुरुस्त करुन दि.०८/०९/२०२२ रोजी दावा दुरुस्त प्रत दाखल केली आहे. परंतु, प्रतिवादी नं.१ ने त्यानंतर विहित मुदतीत जादा कैफियत दाखल करणे गरजेचे होते. परंतु, तांत्रीक कारणास्तव सदरची कैफियत मुदतीत दाखल करणे शक्य झाले नाही. प्रतिवादी नं.१ ची जादा कैफीयत अभिलेखावर न आल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांना कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. वादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, अर्ज खरा, बरोबर नसुन मागणी संयुक्तिक नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादीवर खर्च बसविण्यात यावा, असे वादींचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, असे दिसुन येते की, दि.०८/०९/२०२२ रोजी वादीने दुरुस्त दाव्याची प्रत दाखल केली असुन त्यानंतर दि. ०७/१०/२०२२ पर्यंत प्रतिवादी नं.१ ने जादा कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. परंतु प्रस्तुतचा अर्ज दि. १७/११/२०२२ रोजी म्हणजेच चाळीस दिवसांच्या विलंबाने दाखल करण्यात आला आहे असे दिसुन येते. प्रस्तुत दावा जरी चौकशीसाठी नेमण्यात आलेला असला तरीही त्यानंतर दाव्यात दुरुस्ती झाली आहे. तसेच प्रस्तुतचा दावा हा जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी नं.१ हिस जादा कैफीयत देण्यास संधी न

दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जादा कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे जादा कैफियत देण्यास झालेल्या विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज (नि.५४) मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.07.07 15:04:34 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०७/०७/२०२३.

**( ए.एन. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.